आयुष्य म्हणजे एक प्रवास आहे, प्रत्येक क्षणाला आनंदून जगा

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १७ मार्च २०२५ | अंक ९७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आणखी एका युवकाची क्रूरपणे हत्या, हात-पाय अन मुंडके छाटले





राज्यात गुन्हेगारांना कायद्याची काहीच भीती उरली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोषदेशमुख यांची क्रूरपणे हत्या झाल्याच्या प्रकारानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. आता पुन्हा एका १९ वर्षीय कॉलेज तरुणाचा निर्घृण खून झाला आहे. त्या युवकाचे दोन्ही हात, पाय अनब मुंडके छाटले आहे. त्यानंतर धड एका पोत्यात तर पाय, हात, डोके एका पोत्यात भरुन दोन्ही गाठोडे विहिरीत फेकून दिल्याचा खळबळजनक प्रकार श्रीगोंदा तालुक्याचे सीमेवर असणाऱ्या दाणेवाडी गावामध्ये घडला आहे. माऊली सतीश गव्हाणे असे त्या युवकाचे नाव आहे. तपास गुन्हे शाखेकडेक्रूर हत्येच्या या घटनेने शिरूर, श्रीगोंदा, अहिल्यानगर, पुणे जिल्हा व महाराष्ट्र हादरला आहे. अहिल्यानगर पोलीस अधीक्षकांनी या गुन्ह्याची गंभीर दखल घेतली. त्यांनी हा गुन्हा बेलवंडी पोलीस स्टेशनकडून काढून अहिल्यानगर गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपासासाठी दिला आहे. खून करणारे आरोपींनी कोणताही पुरावा मागे न ठेवला नाही. यामुळे पोलिसांचा गुन्हे अन्वेषण विभाग व पोलीस पथक या गुन्ह्याचा तपास कसा करेल? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बारावीचा पेपर देल्यानंतर माऊल बेपत्ता

माऊली याचा ७ मार्चला बारावीचा पेपर होता. तो पेपर देण्यासाठी त्याच्या दाणेवाडी येथील घरुन शिरूर येथे गेला होता. पेपर दिल्यानंतर परत तो घरीच आला नाही. तो बेपत्ता झाला होता. त्यानंतर गावाजवळ असणाऱ्या एका विहिरीत त्याचा मृतदेह सापडला होता.

## हत्येमागे काय आहे कारण?

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याचे सीमेवर असणाऱ्या दाणेवाडी गावामध्ये माऊली सतीश गव्हाणे (वय १९) या तरुणाची अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आली. निर्घृण खुनामागील नेमके कारण अजून समोर आले नाही. माऊली सतीश गव्हाणे हा बारावीचा विद्यार्थी आहे. त्याचा खून करताना आरोपींनी त्याचे दोन्ही हात पाय अनब मुंडके छाटले. मयताचे शीर, हात, पाय हे झाडे कट करण्याच्या स्वयंचलित कटरने कपल्याची शक्यता आहे. त्यानंतर त्याचे धड एका पोत्यात तर पाय, हात आणि डोके एका पोत्यात भरले. हे दोन्ही गाठोडे त्यामध्ये मोठे दगड भरून दानेवाडी नदीच्या बाजूला असणा-या विहिरींमध्ये टाकून दिले होते. पोलिसांना हे मृतदेह मिळाल्यानंतर माऊलीच्या नातेवाईकांना बोलवण्या आले. त्यांनी तो माऊलच असल्याचे सांगितले.

# तुम्ही आरोपीला वाचवण्याची तयारी करत असाल तर तुमचा विनाश हा जगजाहीर आहे, धनंजय देशमुख

## नेमकं काय म्हणाले धनंजय देशमुख?

**मनोज जरंगे पाटील यांची भेट घेतली त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली, जरांगे पाटील यांच्या बरोबर न्यायालयीन प्रक्रियेबाबत चर्चा झाली, काही लोक कुठेतरी या प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या विषयाला आम्ही कधीही वेगळी दिशा मिळू देणार नाही. आम्ही कोणत्याही गुन्हेगाराचं समर्थन करणार नाही. मात्र काही ठराविक लोक आरोपीचे समर्थन करत आहेत, हे प्रकरण मागे टाकण्यासाठी काहीतरी वेगळं करत आहेत. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याचे समर्थन करणारे कोण असतील, त्यांना असं वाटत आहे की आरोपींना वाचवलं पाहिजे. तुम्ही आरोपीला वाचवण्याची तयारी करत असाल तर तुमचा विनाश हा जगजाहीर आहे, असा इशारा यावेळी देशमुख यांनी दिला**



बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली, वातावरण चांगलंच तापलं. दरम्यान हे प्रकरण सरकारनं सीआयडीकडे सोपवलं आहे, एसआयटीची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून, सीआडीने आरोप पत्र देखील दाखल केलं असून न्यायालयात सुनावणी देखील सुरू झाली आहे. यावर प्रतिक्रिया देताना संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे. येत्या २६ तारखेपासून खऱ्या अर्थाने न्यायालयीन प्रक्रियेला सुरुवात होईल, जर तुम्ही आरोपीला वाचवण्याची तयारी करत असाल तर तुमचा विनाश हा जग जाहीर असेल, असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.

दरम्यान ते पुढे बोलताना म्हणाले की, आम च्या देशमुख कुटुंबावर कुठलेही आरोप नाहीत आम्ही फक्त न्याय मागत आहोत. आम्ही कोणत्याही चुकीच्या गोष्टीचे समर्थन करत नाहीत. २६ मार्च ही न्यायालयाने या प्रकरणात तारीख दिली आहे, आम्ही न्यायाच्या प्रतीक्षेत आहोत, असं धनंजय देशमुख यांनी यावेळी म्हटलं आहे. त्यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली, या भेटीनंतर ते बोलत होते.

# सुरेश धस घेणार खोक्या भोसलेच्या कुटुंबाची भेट!

बीड : आष्टी तालुक्याचे आमदार सुरेश धस यांची आज शिरूर कासार येथे आम सभा पार पडणार आहे. त्यासाठी ते शिरूर कासारमध्ये दाखल झाले आहेत. या आमसभेनंतर ते त्यांचा कार्यकर्ता आणि शिरूरच्या मारहाण प्रकरणातील आरोपी सतीश उर्फ खोक्या भोसले याच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबाची भेट घेणार आहेत.खोक्या भोसले याच्यावर मारहाण प्रकरणाबरोबरच हरणांची शिकार केल्याचा देखील आरोप आहे. खोक्या भोसले याचे घर हे वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने अतिक्रमण तोडक कारवाई करत वन विभागाने २ दिवसांपूर्वी खोक्याचं घर पाडलं आहे. त्यानंतर ही कारवाई करायला एवढी घाई का? असा प्रश्न आमदार सुरेश धस यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर आज ते शिरूर कासार येथे आम सभेला जाणार असून तेथे भोसले कुटुंबाची भेट घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं.



# बीड येथील विद्यार्थिनी आश्लेषा विनोद वाकडे बनली ड्रोन पायलट

बीड : सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकड़े ही ड्रोन पायलट बनली आहे. महाविद्यालयात कृषीचे शिक्षण घेत असतानाच समाजसेवेची आवड असल्यामुळे समाज उपयोगी कही करायचे ह्या विचाराने प्रेरित झाल्यामुळे आणि चिकित्सक बुद्धि ह्यद्वारे ड्रोन बद्दलचे शिक्षण घेऊन ड्रोन पायलट हे नाव साकार केले.. कृषीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर वाढविणेकरिता केंद्र व राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रोत्साहनात्मक अनुदान देत आहे. ड्रोनव्दारे विविध खरिप, रब्बी, फळपिके



तसेच भाजीपाला पिकावर किटकनाशकाची फवारणी सुलभरित्या करता येते. मात्र, योग्यरित्या ड्रोन चालवू शकतील, असे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात आज उपलब्ध नाही. ह्याच गोष्टीचा विचार करुन सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकडे हिने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे प्रायोजित महात्मा फुले कृषी राहुरी विद्यापीठ अंतर्गत रिमोट पायलट प्रशिक्षण संस्थेमार्फत ड्रोन पायलट प्रशिक्षण पुर्ण करुन रिमोट पायलट प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. प्रशिक्षण प्राप्त करुन न थांबता या विद्यार्थ्यांनीने परिसरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती मध्ये ड्रोन द्वारे फवारणी करण्यासाठी ड्रोन खरेदी केले आहे. एवढ्या वर च न थंबता त्यांच्या परिसरातील आणि महाविद्यालयतिल विद्यार्थ्यांना त्यांच्या ड्रोन पायलट ह्या विषयी असलेले मार्गदर्शन करुन अजुन ड्रोन वपरबद्दल जनजागृति घडवयाचा त्यांच्या मानस आहे. आणि त्यांच्या ड्रोन विषयी असलेल्या माहिती च्या आधारे शेती मध्ये नवीन ंशिलहपेश्रेसू वापरून कमी ख़र्चत जास्त उतपन्न कसे घडेल ह्यबद्दल त्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांना लाभ व्हावा ह्यसाठी पुढाकार घेण्याचा त्यांच संकल्प आहे.त्यांच्या ह्या यश मध्ये त्यांना महाविद्यालय चे जी.ही .साळुंके सर तसेचं मुख्याध्यापक एस .पी .मोरे सर मार्गदर्शन लाभले.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत आडसकर यांच्या खंदे समर्थकांचा प्रवेश

केज : केज तालुक्यातील वरपगाव येथील रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक २० वर्ष सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन राहीलेले श्री. अंकुश नाना देशमुख व व्हाइस. चेअरमन श्री. अंबरभाई शेख यांनी अँड. बाबुराव देशमुख य्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खा.मा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार



पक्षात प्रवेश केलाआहे त्यामुळे केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार पडताना दिसत आहे अनेक वर्षे आडसकर गटा सोबत काम करणारे कार्यकर्ते रमेशराव आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत कारण आडसकर यांनी चिंचोली माळी जिल्हा परिषद अनेक वर्षे चालवली परंतु कवडीचा पण विकास त्यांना करता आला नाही. परंतु खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाच वर्षे चिंचोली माळी जिल्हा परिषदेवर काम केले पन भरघोस विकास निधी चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दीला व आडसकर यांनी २५ वर्षात जो विकास चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये केला नाही

# जातीपातीच्या राजकारणावरुन नितीन गडकरींचा संताप, म्हणाले जो करेगा जात की बात, उसके कस के मारुंगा लात

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जात, पंथ, धर्म, भाषा किंवा लिंगावरून भेदभाव करणे चुकीचे

एखादी व्यक्ती त्याच्या जाती, पंथ, धर्म, भाषा किंवा लिंगावरून ओळखली जात नाही. तर केवळ त्याच्या गुणांवरून ओळखली जाते. मी ५० हजार लोकांना सांगितलंय की जो करेगा जात की बात, उसके कस के मारूंगा लात, असे स्पष्ट वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. नागपुरात एका कार्यक्रम ला संबोधित करताना त्यांनी हे विधान केले. माणसाकडे असलेल्या गुणां मुळे माणूस मोठा होतो नागपूरमध्ये आज दीक्षांत समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यता आले होते. ङ्यावेळी त्यांनी जात, धर्म, पंथ यावरुन सुरु असलेल्या वादावर भाष्य केले. तुम्ही दिवसातून अनेक वेळा नमाज पठण करा. म ात्र नमाज पठनाबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानाचे ज्ञान घेणे गरजेचे आहे. इंजिनिअर, डॉक्टर, आयएएस तयार झाले तरच समाजाचा विकास होईल. जात, पंत, भाषा लिंग आणि धर्मामुळे माणूस ओळखला जात नाही तर माणसाकडे असलेल्या गुणांमुळे माणूस मोठा होतो, असेही नितीन गडकरी म्हणाले. जातीच्या आधारे बरेच लोक मला भेटायला येतात एखादी व्यक्ती त्याच्या जाती, पंथ, धर्म, भाषा किंवा लिंगावरून ओळखली जात नाही. तर केवळ त्याच्या गुणांवरून ओळखली




जाते. म्हणूनच आपण जात, पंथ, धर्म, भाषा किंवा लिंगावरून कोणाशीही भेदभाव करणार नाही. मी राजकारणात आहे आणि येथे हे सर्व चालू आहे. परंतु मला मते मि ळतील किंवा नाही, तरीही मी हे नाकारतो. जातीच्या आधारे बरेच लोक मला भेटायला येतात. मी ५०,००० लोकांना सांगितले, जो करेलगा जात की बात, उसके कस के मारूंगा लात.फ माझ्या मित्रांनी मला सांगितले की मी हे बोलून स्वतःचे नुकसान केले असेल. पण मला त्याची चिंता नाही; जर कोणी निवडणूक हरला तर तो आपला जीव गमावत नाही. मी माझ्या तत्वांवर टिकून राहीन, असे नितीन गडकरींनी म्हटले. हजारो विद्यार्थी इंजिनिअर झाले मी निवडणूक हरलो किंवा मंत्रिपद मिळाले नाही तर मी काय मरणार नाही. मात्र मी म ाझ्या भूमिकेवर आधीपासून ठाम आहे आणि राहील. मी आमदार असताना अंजुमन-ए-इस्लाम इन्स्टिट्यूट (नागपूर) इंजिनिअरिंग कॉलेजला परवानगी दिली होती. मुस्लीम समाजाला याची गरज आहे, असे मला वाटत होते. मुस्लीम समाजातून अधिकाधिक अभियंते, आयपीएस, आयएएस अधिकारी निर्माण झाले तर सर्वांचा विकास होईल. माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. अंजुमन-ए-इस्लामच्या बॅनरखाली आज हजारो विद्यार्थी इंजिनिअर झाले आहेत,असेही नितीन गडकरींनी सांगितले.

बीड/महाराष्ट्र

मराठी साहित्य

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १७ मार्च २०२५

https://lokaarambh.com



## संपादकीय

## वाईट गोष्टी होळीत दहन करा

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे ताजे वक्तव्य पाहता ही शंका खरी ठरणार, असे दिसते. युक्रेनचे अध्यक्ष व्लजिमिर झिल्येन्स्की हे अमेरिकेच्या दौऱ्यावर आले असताना ट्रम्प यांनी त्यांना अत्यंत अवमानास्पद वागणूक दिली; तसेच युद्ध थांबविण्याची तंबीही दिली. आपण युद्ध थांबविण्यास तयार आहोत; परंतु रशिया आक्रमण करणार नाही, याची हमी कोण देणार, असा वास्तववादी आणि अनुभवजन्य सवाल झिल्येन्स्की यांनी त्या वेळी केला होता. मात्र, त्याला उत्तर न देता ट्रम्प यांनी झिल्येन्स्की यांच्यावरच तिसरे महायुद्ध सुरू करीत असल्याचा दोषारोप केला होता. अमेरिकेतून रिकाम्या हाताने परतल्यानंतरही झिल्येन्स्की यांनी वॉशिंग्टनच्या मदतीबाबत सकारात्मक दाखवली. युक्रेनमधील खनिजसंपत्तीच्या बाबतीत अमेरिकेच्या शर्तींवर करार करण्याची तयारीही त्यांनी दाखविली. युद्धबंदीच्या दिशेने त्यांची ही पावले पडत असताना, रशियालाही त्यासाठी तयार करण्याची जबाबदारी अमेरिकेवर आहे. ट्रम्प यांनी तशी वक्तव्येही केली आहेत. मात्र, रशियाकडून होकार मिळविण्यात त्यांना अद्याप यश आलेले नाही. पुतिन यांनी युद्धबंदीसाठी सादर केलेली अटींची लांबलचक यादी पाहता ते यासाठी किती उत्सुक आहेत, हेच दिसते. युद्धबंदीसाठी अटी लादण्यामागे कालहरणाची आणि वाटाघाटींत आपल्याला हवे ते पदरात पाडून घेण्याची पुतिन यांची नीतीही दिसते. युद्धबंदीसाठी आपण तत्त्वतः तयार आहोत, असे पुतिन यांनी म्हटले असले, तरी व्यावहारिक पातळीवर त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. या युद्धाच्या मूळ कारणांपर्यंत जाऊन त्यांची सोडवणूक करण्याकडे पुतिन यांनी अंगुलिनिर्देश केला आहे. युरोपीय देशांना संरक्षणाचे छत्र पुरविणाऱ्या ङ्गनाटोफ्मध्ये युक्रेनला सहभागी करून घेणे पुतिन यांना कधीच मान्य नव्हते. यामुळे रशियाच्या सीमेवर ङ्गनाटोफ येईल, असे त्यांचे म्हणणे होते. हा मुद्दा ते आजही उपस्थित करतात. युद्धबंदीच्या तीस दिवसांत युक्रेनने कोणतीही नवीन शस्त्रास्त्रे घेऊ नयेत; तसेच त्या देशाला पाश्चिमात्यांकडून होणारी लष्करी मदतही थांबविली जावी, अशी मागणी पुतिन यांनी केली आहे. युद्धाच्या आघाडीवर रशियाचे सैन्य आगेकूच करीत असून, त्यांचा सामना करणे युक्रेनला शक्य नाही; अशा स्थितीत शस्त्रसज्ज होण्यासाठी युक्रेनला युद्धबंदी हवी आहे, असा पुतिन यांचा दावा आहे. युद्धबंदी म्हणजे युक्रेनला शस्त्रसज्ज होण्यासाठी आवश्यक असलेला विराम असल्याचा अर्थ पुतिन लावत आहेत. ङ्गयुद्धबंदीच्या तीस दिवसांत युक्रेन काय करणार आहे? तो सैन्यांची जुळवाजुळण करणार ना? युक्रेनला शस्त्रास्त्रे पुरविली जाणार ना,फ असे प्रश्न म्हणूनच ते युक्रेनला आणि युद्धबंदीसाठी आग्रही असलेल्या अमेरिकेला विचारत आहेत. शांतता निर्माण करण्यासाठी ट्रम्प यांनी पावले उचलली असल्याने त्यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असे वक्तव्यही पुतिन यांनी केले आहे. ट्रम्प यांच्या दाव्यातील फोलपणा दाखवितानाच वाटाघाटीसाठी पृष्ठभूमी तयार करण्याचा प्रयत्न पुतिन करीत आहेत. रशियाने युद्धबंदी मान्य करावी; तसे न झाल्यास ते निराशाजनक असेल, हे ट्रम्प यांचे विधान युद्धबंदीबाबत सध्या तरी सकारात्मकता दाखविणारे नाही. रशियावर आणखी निर्बंध लादण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र, त्याला रशिया जुमानण्याची शक्यता दिसत नाही. युद्धबंदीबाबत रशियाचा पवित्रा असाच असेल, याची शक्यता

युक्रेनने आधी वर्तविली होती; म्हणूनच आपण संरक्षणाची हमी मागत होतो, अशी भूमिका झिल्येन्स्की यांनी घेतली आहे. युद्धाबाबत आपल्याला हवे तसे वळण देण्याचा प्रयत्न रशिया करीत असून, त्यासाठीच पुतिन अटी लादत असल्याचा त्यांचा आरोप आहे. आपण युद्धबंदी करू, असा दावा करणारे ट्रम्प यांची खरी

# केंद्र विरुद्ध द्रमुक! रुपयाच्या चिन्हाशी छेडछाड

जगातील सर्वाधिक मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर आपल्या देशाचा सतत उदोउदो होत असतो. विविधतेतून एकता आणि एकतेतून विविधता हा आपल्या भारताचा परिचय आहे. विविध धर्म, जाती उपजातींचा मिलाफ असलेला आपला भारत देश आहे. भारतात जातीय, धार्मिक दंगली यापूर्वी झाल्या, भाषिक वाद झाले. सीमावादही झाले. भारतातून वेगळे निघण्यासाठी पाकपुरस्कृत समाजविघातक शक्तींनी पंजाब गेली अनेक वर्षे धुमसत ठेवला. पण या जातीत, धार्मिक दंगली, कलह क्षणिक ठरले आणि ठरावीक काळानंतर सर्व देशवासी गुण्यागोविंदाने राहू लागले. हा आपल्या देशाचा १९४७ पासूनचा इतिहास आहे. विविध जाती-धर्माचे लोक येथे एकत्र वास्तव्य करत असताना, येथे भाषिक वाद असतानाही देशाचे चलन मात्र एकच राहिले आहे. गेल्या काही दिवसांपासून लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेवरून दाक्षिणात्य राज्यांमध्ये वाद सुरू झाला आहे. लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना ही लोकसंख्यानिहाय होत असल्याने नव्याने होत असलेल्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये हिंदी भाषिक पट्ट्यामध्ये लोकसभा मतदारसंघांची वाढ होणार असून तामिळ, कन्नड या बिगर हिंदी पट्ट्यात लोकसभा मतदारसंघांची संख्या घटणार आहे. यावरूनच तमिळ पट्ट्यात लोकसभा मतदारसंघाची नजीकच्या भविष्यात संख्या घटणार असल्याने राजकीय वाद चिघळण्यास सुरुवात झाली आहे. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये स्थानिकांना भडकावून एकगठ्ठा मतदान वळविण्याचा हा सर्व प्रकार सुरू आहे. तामिळनाडू सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पासाठी काही प्रचार साहित्य तयार केले आहे. यात त्यांनी भारतीय रुपयाच्या चिन्हाशी छेडछाड करत, ते तमिळ भाषेत केले आहे. स्टॅलिन सरकारच्या या कृत्यामुळे आता देशातील राजकारण तापण्यास सुरुवात झालेली आहे. या संदर्भात एकीकडे हा राष्ट्रीय चिन्हाचा अनादर असल्याचे भाजपाने म्हटले आहे, तर दुसरीकडे हा तमिळ भाषेचा सन्मान असल्याचे द्रमुकने म्हटले आहे. स्टॅलिन सरकारच्या या कृत्यावर देशातील अधिकाधिक राजकीय घटक भडकले असून विविध राज्यांतून संतप्त सूर उमटू लागले आहेत. तामिळनाडू सरकारने रुपयाचे चिन्ह हटवले, त्यांचे हे पाऊल म्हणजे, घातक मानसिकतेचा संकेत आहे. स्टॅलिन सरकारने केलेले हे कृत्य म्हणजे ही एक प्रकारची घातक मानसिकता आहे. तसेच, जागतिक आर्थिक व्यवहारांमध्ये भारताची ओळख म्हणून काम करते. भारत यूपीआय वापरून सीमापार पेमेंटला प्रोत्साहन देत असतानाच, आपण खरोखरच आपल्या स्वतःच्या राष्ट्रीय चलन चिन्हाला कमी लेखले योग्य आहे? असा प्रश्न आता विविध थरातून उपस्थित करण्यात येत आहे. खरे तर, इंडोनेशिया, मालदीव, मॉरिशस, नेपाळ, सेशेल्स आणि श्रीलंकेसह अनेक देश आपले चलन अधिकृतपणे, ङ्गरुपयाफ अथवा या नावाशी मिळत्या जुळत्या नावाने वापरतात. लोकसभा निवडणुकीत सर्व राज्यातून निवडून आलेले प्रतिनिधी आणि अधिकारी आपल्या राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि अखंडता राखण्यासाठी संविधानांतर्गत शपथ घेतात. राज्याच्या अर्थसंकल्पीय कागदपत्रांमधून रुपयासारखे राष्ट्रीय चिन्ह काढून टाकणे हे त्या शपथेविरुद्ध आहे. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची वचनबद्धता कमकुवत होते. स्टॅलिन सरकारने रुपयाचे चिन्ह हटवले असले तरी या चिन्हाचे डिझाईन द्रमुकचे माजी आमदार एन. धर्मलिंगम यांचे पुत्र डी. उदय कुमार यांनी केले होते. आता हे नाकारत, द्रमुक केवळ एका राष्ट्रीय प्रतीकच नाकारत नाही, तर एका तमिळ तरुणाच्या सर्जनशील योगदानाकडेही पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. ज्या माणसाने हे डिझाईन तयार केले, त्याच माणसाचे राज्यातील सत्ताधारी मतांच्या समीकरणांसाठी प्रतीक नाकारत आहे, हे एक प्रकारचे विडंबनच आहे. तमिळनाडूमध्ये त्रिभाषा सूत्रावरून वाद सुरू असताना, तसेच मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारशी दोन हात करण्याची तयार करणाऱ्या द्रमुक सरकारने केंद्राविरुद्ध नवा प्रतीकात्मक पवित्रा घेत आता रुपयाच्या चिन्हावर वार केला आहे. यंदाच्या राज्य अर्थसंकल्पात रुपयाच्या राष्ट्रीय चिन्हाऐवजी तमिळ अक्षराचा वापर असलेल्या चिन्हाला स्थान दिले आहे. तमिळनाडूचे अर्थमंत्री थंगम थेन्नारासू शुक्रवारी अर्थसंकल्प सादर करणार असतानाच तमिळनाडूने हे नवे चिन्ह गुरुवारी जारी केले. यात ङ्गरुबाईफ या तमिळ शब्दाचे पहिले अक्षर ङ्गरुफ दर्शविले आहे. ते स्थानिक भाषेत भारतीय चलन दर्शवते. त्यावर ङ्गसर्वांसाठी सर्व काहीफ असे लिहिले आहे. अर्थसंकल्पात सरकारचे सर्वसमावेशक मॉडेल असल्याचा द्रमुकचा दावा आहे. तमिळनाडूतील सत्ताधारी द्रमुकच्या एका शिष्टमंडळाने गुरुवारी तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांची भेट घेतली. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन २२ मार्च रोजी चेन्नईत मतदारसंघाच्या पुनर्रचनेसंदर्भात बैठक घेत आहेत. रेड्डी यांना या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले. भाजपाचे पुनर्रचना धोरण हे दक्षिणेतील राज्यांविरोधातील कट आहे, अशी टीका द्रमुककडून करण्यात येत आहे. डॉलर आणि युरोच्या धर्तीवर भारतीय रुपयाचे चिन्ह तयार करण्यात आले होते. या अधिकृत चिन्हाचे डिझाइन तयार करणारे उदयकुमार धर्मलिंगम हे तमिळ आहेत. रुपयाचे चिन्ह तयार करण्यासाठी २०१० मध्ये देशपातळीवर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत उदयकुमार यांच्या चिन्हाने बाजी मारली होती. त्यानंतर रिझर्व्ह बँकेसह केंद्र सरकारने रुपयाचे हे चिन्ह भारतीय चलनाचा अधिकृत लोगो म्हणून वापरण्यास मान्यता दिली. स्टॅलिन सरकारच्या कृतीचा प्रत्येक भारतीयाने निषेध करणे आवश्यक आहे. आज रुपयाचे डिझाईन बदली केले, उद्या हाच प्रकार अन्य बाबतीत घडू शकतो. माणसापेक्षा, राज्यापेक्षा देश मोठा आहे आणि कायम राहणार, हे प्रत्येकाने सर्वप्रथम आपल्या मनावर बिंबविले पाहिजे. तामिळनाडूने केलेला प्रकार चुकीचा आहे. याला कोठेतरी पायबंद घातलाच पाहिजे.

लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना हा वेगळा भाग आहे, त्यास न्यायालयात आक्षेप घेऊन न्यायालयीन लढाई लढणे उचित ठरेल, पण त्यासाठी रुपयाचे डिझाईनच बदलणे कदापि योग्य ठरणार नाही.

# रुग्णांना लुटणाऱ्या डॉक्टरांना ज्ञानराधाने लुटले; नियती हिशोब करते

डॉक्टरच्या बेलगाम वागण्याला आळा बसणार का? की असेच डॉक्टर लोक बेफाम वागणार? माणुसकीचा हा तिढा संपणार कधी? मेलेल्या मड्यावरील लोणी खाण्याची सवय लागलेल्या डॉक्टर चे काय करायचे? सामान्य लोकांना डॉक्टर म्हटले की अंगावर काटा येतो. हे अगदी खरंच आहे. अशी एक धास्ती बसते की, एकदा दवाखान्यात गेलो तर आता किती पैसा लागेल याची. गरीब लोकांनी तर जाण्याचा प्रश्नच नाही. वारेमाप पैसे घेऊन पण सुविधा म्हणाव्या तश्या नाहीत. एखादे ऑपरेशन असेल तर मग ती धास्ती वेगळीच असते. ऑपरेशन होण्याच्या आधीचे मेडिसीन, ऑपरेशन होतानाचे तर विचारूच नका आणि बाकी ऑपरेशन झाल्यावर फक्त मेडिसीनच ऑपरेशन च्या बिला एवढे होते. डॉक्टरांनी बेफाम वागायचं आणि आपण ते सहन करायचं एवढंच चालत आहे. यांच्या या पैसे आणि बिलांमुळे किती तरी पेशंट ने आपले होते नव्हते ते सर्व दिले. कधी ऑपरेशनच्या बिलासाठी घरदारे गेली तर कधी कर्ज करून ठेवली. हॉस्पिटल चे बिल घ्यावेत नक्की पण त्याला काही मर्यादा असते की नाही?काही ठिकाणी तर पैसे जास्तीचे घेऊन पण सुविधा नसतात. तिथेही पेशन्ट ची फरपट. लहापणापासून ऐकत आलो की, डॉक्टर हा देवासमान असतो. देवांचा खूप लाडका असतो. प्रत्येक पेशंट ला देवाला भेटता येत नाही म्हणून त्याने डॉक्टर ला पाठविले आहे. लहानपणी किती गोड समजूत असते ना आपली. पण जसजसे आपण मोठे होतो तसे प्रत्यक्षात खरेच असते का? डॉक्टर देव असतो ही भाबडी समजूत मोठेपणी खरं आणि वास्तव स्वरूप दाखवते. पैश्यासाठी कित्येक डॉक्टर पेशंट कितीही इमर्जन्सी असला तरी पैसे भरल्याशिवाय पेशंटला हात देखील लावत नाहीत. इतका व्यवहारिकपणा असतो त्यांच्या जवळ की हेच पैसे घेऊन हे डॉक्टर करोडोची संपत्ती गोळा करतात. बिलाची पर्वा न करता जो पैसा गोळा होतो तो बँकेत, पतसंस्थेत टाकून मोकळे होतात. पण ज्या पेशंटची परिस्थिती नसताना खूप खटाटोप करून पैसा गोळा करतात अन डॉक्टर लोक हेच पैसे बँकेत टाकतात. पण नियतीचे चक्र गोल आहे ते फिरून आपल्या भोवतीच परत येते. ज्या ज्ञानराधा बँकेत याच डॉक्टर लोकांनी करोडो रुपये भरले आज ती बँक बंद पडली. यालाच नियतीचे चक्र म्हणतात. यालाच हेही म्हणतात कि, हपापाचा माल गपापा. बिल करावीत पण इतकी कि तुमच्या कडे काही वर्षांतच करोडो रुपये यावेत. तत्वांवर चालणारी डॉक्टरांची पिढी खरंच संपली का? डॉक्टर ला देव मानणारी पेशन्ट ची पिढीही संपली का? आपल्या समाजात गोरगरीब ही आहेत आणि ते एवढे बिल भरू शकत नाही म्हणून जुन्या कित्येक डॉक्टरांनी माणुसकीपायी अनेकांचे फक्त आशीर्वाद घेऊन ऑपरेशन केले आहेत पण ती पिढी सुद्धा आता संपली आहे का? किती तरी डॉक्टर ऑपरेशन आणि ऑपरेशन नंतर जी काळजी घ्यायची असते ती काळजी सुद्धा घेत नाहीत. मला मिळालेला एक अनुभव खूप वाईट आहे. इथे मी त्या हॉस्पिटल चे नाव घेत नाही. एक वर्षापूर्वीचा अनुभव आहे. माझी आजी घरात पडली आणि तिचे इन्स्टंट ऑपरेशन करावे लागले तसे ऑपरेशन केलेही आणि ऑपरेशन चे टाके काढण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेलो आणि वरच्या मजल्यावर घेऊन जाण्यासाठी स्ट्रेचरवर घेऊन गेलोत. आत ड्रेसिंग रूम मध्ये गेलो. तिचे आता टाके काढणार म्हणून मी ही आत सोबत म्हणून गेले. टाके काढले गेले. आयोडीन घेण्यासाठी हॉस्पिटल मधील मुलगा मागे वळला. तितक्यात अगदी काही क्षणांमध्येच स्ट्रेचर निसटले आणि आजी खाली पडली नुकत्याच झालेल्या ऑपरेशनला धक्का लागला तसेच डोक्यालाही मार लागला आणि डोक्यातून खूप रक्त स्राव चालू झाला. डॉक्टरांनी येऊन पाहिलं काय झाले ते डोक्याला बँडेज लावून त्यांनी घाईतच एक्स-रे काढला. एक्स-रे ओके म्हणून जा म्हणाले काही जास्त जाणवलं तर कोठेतरी दाखवा म्हणाले परंतु त्या क्षणी मी डॉक्टरांना म्हटले की, खूप रक्तस्राव होतोय आणि कंबरेच्या खाली मारही लागलाय. पाय हि पूर्ण फोल्ड झालाय तर तुम्ही तीला ॲडमिट करा आणि ट्रीटमेंट द्या. मी खूप वेळेस विनंती करूनही त्यांनी जबाबदारी झटकली आणि घरी पाठवले. इतके तीला लागले होते शेवटी आम्ही तीला औरंगाबादला घेऊन गेलो. तिथे ऑपरेशन झाले परंतु बीपी खूप कमी झाल्यामुळे ती तिथेच मरण पावली. मरताना तिच्या वेदना असह्य होत होत्या. क्षणोक्षणी ती स्ट्रेचर वरून कशी, पडली कसे लागले हेच आठवत होते. बिघडलेले स्ट्रेचर, डॉक्टराने नाकारलेली जबाबदारी, एक्सपर्ट नसलेला स्टाफ, जीवावर आल्यासारखे वागणारे तेथील कर्मचारी स्टाफ. आजही गलबलून टाकते. सतत मनात प्रश्न असतात की, नामांकित हॉस्पिटल असूनही पेशंटचे हाल होतात. हॉस्पिटल साहित्य चांगले आणि सुव्यवस्थित आहे का? हे पाहणे डॉक्टर लोकांची जबाबदारी आहे की नाही? असे किती तरी लोक डॉक्टरांच्या अश्या हलगर्जीपणामुळे गेले-मेले असतील.

**रुपाली देशपांडे**

# हलाल मांस : शास्त्रीय दृष्टिकोन

निःसंशय अल्लाहकडून तुमच्यावर जर कोणता प्रतिबंध असेल तर तो म्हणजे मृत प्राण्यांचे मास, रक्त, डुक्कराचे मास, आणि ज्यावर अल्लाह व्यतिरिक्त अन्य कोणाचे नाव घेतलेले असेल, त्या सर्व तुमच्यासाठी वर्ज्य आहेत.फ (कुरआन २:१७३) या आयतीमध्ये स्पष्टपणे बजावले आहे की जर तुम्ही खरे श्रद्धावंत असाल तर फक्त ज्या वस्तू शुद्ध असतील त्याच तुमच्या अहारात घ्या. ज्या निषिद्ध म्हटल्या आहेत त्याचे तुम्ही कधीही खाऊ नका. सुळे असलेले तसेच हिंस्र पशू खाण्यास इस्लामने निषिद्ध ठरवली आहेत. नैसर्गिक मृत्यू पावलेली अथवा अपघाताने मेलेली




जनावरे निषिद्ध ठरवलेली आहेत. कारण त्या जनावरांचे रक्त शरीरातच थिजून अथवा साकळून राहते, ते वाहून जात नाही. हलाल पद्धतीने मारलेल्या जनावराचे मांस शुद्ध मानले आहे, कारण त्याचे संपूर्ण रक्त वाहून जाते. विज्ञानाने हे सिद्ध झालेले आहे की मानवासाठी रक्त हे अपायकारक व घातक आहे. कारण रक्ताच्या पृथःकरणाने स्पष्ट झाले आहे की रक्तात असणारे युरिक सिड हे मानवासाठी विषासमान आहे. हलाल पद्धतीत फक्त घशाजवळची मुख्य नस ईश्वराचे नाव घेऊन कापली जाते. त्यामुळे जनावराच्या शरीरातील सर्व रक्त वाहून जाते. त्याच्या इतर महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहोचत नाही. मेंदू, यकृत, हृदय हे महत्त्वाचे अवयव कापले गेले तर जनावराचा तात्काळ मृत्यू होतो. त्याचे रक्त वाहून जात नाही, ते शरीरातच थिजते. जे माणसाच्या आरोग्यास हानिकारक असते. हलाल पद्धतीने जनावर कापले गेल्यास सर्व रक्त वाहून जाते व युरिक सिड देखील वाहून जाते. कुरआनने डुकराचे मांस निषिद्ध ठरवले आहे, त्याची त्याकाळी मानवाला कारणे माहीत नव्हती, पण आज त्यामागील कारणे ज्ञात झाली आहेत. मानवाच्या व चण्याच्या शरीरात युरिक सिड असते जे मूत्रपिंडाद्वारे शोषले जाते व मूत्रातून शरीराबाहेर फेकले जाते. डुकराची अवयव रचनाच अशी आहे की त्याच्या शरीरातील युरिक सिड ९८ टक्के त्याच्या शरीरातच राहते व फक्त दोन टक्के बाहेर पडते. मानवाच्या बाबतीत ९८ टक्के युरिक सिड मूत्राद्वारे बाहेर पडते. डुकरांना मुख्य व्याधी ही संधीवाताची असते. त्यामुळे डुकराचे मांस खाणाऱ्यांना संधीवाताची बाधा मोठ्या प्रमाणावर वाढते. हे महत्त्वाचे वैद्यकीय कारण आहे. असे अनेक अपायकारक घटक डुकराच्या मासांत असतात.

संदर्भ ग्रंथ : इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग

आर्किटेक्ट अर्शद शेख
मु.पो.अंबाजोगाई

# सिरसमार्ग उपोषणकर्त्यांचे आजपासून जलत्याग

## प्रशासनाने दखल न घेतल्याने करणार कठोर उपोषण, शेतकरी घेणार सहभाग

बीड । प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे विविध मागण्यांसाठी गेल्या पंधरा दिवसापासून शेतकरी उपोषणाला बसले आहेत. या उपोषणाची अद्यापही प्रशासनाने दखल न घेतल्याने सोमवारपासून शेतकरी जलत्याग करणार आहेत. यासंदर्भात शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी यांना निवेदनही दिले आहे. सिंदफणा पट्ट्यात शेतीला बारमाही पाण्याची सोय नसल्याने व दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडत असल्याने शेती तोट्यात जाते. परिणामी सुपीक जमिनीचा हा भाग असतानाही शेतकऱ्यावर आत्महत्या करणे, स्थलांतर करणे व शेतकऱ्यांच्या मुलांवर बेरोजगारीची वेळ येते. हे दुष्टचक्र थांबविण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदीमध्ये सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मातोरी कोळगाव मादळमोही पाडळसिंगी गडी पाचेगाव या शिवारातून उपकाल्वा करावा यासह इतर मागण्यांसाठी गेल्या पंधरा दिवसापासून १४० गावातील व लोकलढा आंदोलनातील शेतकरी सिरसमार्ग येथे उपोषण करत आहेत. या उपोषणाची दखल अद्यापही जिल्हा प्रशासनाने घेतलेली नाही तसेच अर्थसंकल्पात नवीन योजनांसाठी एक रुपयाही निधी दिला नाही त्यामुळे उद्या सोमवार (दि.१७) पासून पाणी न पिता उपोषण करण्याचा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतलेला आहे. भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, समन्वयक दिनेश गुळवे, देविदास चव्हाण, महादेव रडे, गणेश जाधव, भास्कर खांडे पाटील, बाबुराव जेठे, शामराव घुगे, राजाभाऊ महाराज कुटे, गणेश हाडुळे, रामदास महाराज निर्मळ, दिपकराव जाधव, रामेश्वर गाडे, विजयकुमार करपे, हनुमान गायकवाड, बालासाहेब शेरकर, आदीनाथ जोगदंड, काशीनाथ जोगदंड पाटील, गहिनीनाथ पालवे, रामप्रभू गात, संतोष रडे, ज्ञानेश्वर तांबारे आदींसह या लोकलढा आंदोलनातील १४० गावातील शेतकरी यावेळी उपस्थित राहणार आहेत. सिरसमार्ग आंदोलनाला शनिवारी गेवराई तालुका भाजप समन्वयक श्रीकांत सानप, कोळगाव येथील माजी सरपंच एड उद्धव रासकर, गहिनीनाथ पालवे, पारगाव येथील रामकिसन वाघमोडे पाटील, विलास नवले, महादेव घिगे, अभिषेक गव्हाणे, सावरगाव येथील हनुमान गाणकवाड, सावळाराम क्षीरसागर, ज्ञानेश्वर इंगोले, महेश डोंगरे आदी उपस्थित होते. यावेळी श्रीकांत सानप म्हणाले की शेतकऱ्यांसाठी महत्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात योजना करण्यासाठी मंत्री पंकजाताई मुंडे यांना साकडे घालून हा प्रश्न सोडवण्यासाठी विनंती करू.

# अवैधरित्या तलवार बाळगुन दहशत माजवणाऱ्या व अवैध दरु विक्री करणाऱ्या हॉटेलवर पोलीसांची कारवाइ



माजलगाव । प्रतिनिधी


येथिल छत्रपती शिवाजी चौक येथे इसम अमोल बबनराव गावडे रा. पंचशीलनगर माजलगाव हा अवैधरित्या स्वतःचे ताब्यात तलवार बाळगून परीसरात दहशत माजवत असल्याची माहिती माजलगांव शहर पोलीसांना मिळाल्याने या इसमाविरुध्द पोलीसांनी छापा मारून त्यास तलवारीसह ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातून एक लोखंडी तलवार जप्त करण्यात आली असुन याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये कारवाई करण्यात आली. तसेच धुलीवंदन सणानिमित्त पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव बायपास रोड माजलगाव येथे असलेल्या अक्षरा नावाचे हॉटेलवर छापा मारून तेथून ९७०/-रुपयाची देशी व विदेशी दारू तसेच माजलगाव ते गढी जाणारे रोडलागत असलेल्या शिवशाही नावाचे हॉटेलवर छापा मारून तेथून ७६७०/- रुपयाची देशी व विदेशी दारू अशी ८६४०/- रुपयाची देशी विदेशी दारु जप्त करुन अक्षरा हॉटेल मालक प्रदीप मधुकर साळवे शिवशाही हॉटेल मालक गोपीनाथ अच्युतराव शिंदे यांच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, नीरज राजगुरु पोलीस उपअधीक्षक उपविभाग गेवराई, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक सतीश दिंडे, आकाश मारवने पोलीस कर्मचारी किशोर जाधव, सुनील गवळी, पोहेकॉ संदिप मोरे, पोलीस अंमलदार अमोल कदम, शिवगणेश मिरकले यांनी केली आह

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १७ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# आवाजहीनांचे आवाज व्हा-ॲड.सुमेध गायकवाड



केज । प्रतिनिधी पाऊसिबल निमल वेल्फेअर फाउंडेशन तर्फे केज शहरात प्राण्यांच्या संरक्षणासंदर्भात कायदेशीर जनजागृती व अन्न वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या स्थळी कायदेशीर जनजागृती ,भूतदया व संविधानातील मूलभूत कर्तव्य ५१ ए जी याची माहिती देण्यात आली व प्राण्यांपासून होणारे हल्ले त्यांची कारणे व त्याचे निवारणासाठीचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या वेळेस करण्यात आले त्यासाठी नागरिकांनी व प्रशासनाने लसीकरण, नसबंदी व अन्नदान करून या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सदरील कार्यक्रमास फाउंडेशनचे संस्थापक ॲड.सुमेध गायकवाड,ॲड. अशोक माने, श्रद्धा सानप,ॲड.दिनकर सपाटे,ॲड.राहुल गायकवाड , ॲड संजय मिसळे,ॲड.क्रांती तांदळे, ॲड. अनमोल देवधरे, ॲड.भाऊसाहेब यादव, राहुल माने, शोभाताई गायकवाड, प्रणाली माने, दिपाली माने आदी उपस्थित होते.

# वडजी येथील कमांडो बाबासाहेब झीने हे २४ वर्ष देशाची सेवा बजावावून सेवानिवृत्त

सैन्य दलात भरती होऊन देशसेवा करण्याची अनेकांची स्वप्ने असतात. पण हे स्वप्न प्रत्येकाचंच पूर्ण होत नाही. सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावून देशाचं संरक्षण करतात. पण हा सैनिक जेव्हा देशसेवा करुन पुन्हा एकदा घरी परततो तेव्हा प्रत्येकाचं ऊर अभिमानाने भरुन येतं. असाच क्षण पैठण तालुक्यातील वडजी गावात पाहायला मिळाला. २४ वर्ष देशाचं रक्षण करून सुखरूप घरी परतणाऱ्या एका जवानाचं वडजी या अख्ख्या गावाने स्वागत केलं बाबासाहेब गंगाधर झिने हे आयटीबीपी कमांडो या पदावर कार्यात होते त्यांनी २४ वर्ष सीमेवर देशसेवा केली. सेवानिवृत्त होऊन आपल्या गावी आल्यानंतर बँड बाजा वाजवून त्यांचं स्वागत केलं संपूर्ण गाव पुष्पगुच्छ घेऊन स्वागतासाठी उभं होतं. नुकतेच बाबासाहेब झिने हे सैन्य दलातून निवृत्त झाले. देशसेवा करून गावी पोहोचल्यावर संपूर्ण गाव भावुक झालं होतं. जवानाच्या स्वागताला संपूर्ण गावंच नव्हे, तर पंचक्रोशीतील नातेवाईकांनीही हजेरी लावली. सर्वात आनंद होता तो म्हणजे जवानाच्या कुटु बीयांना... जवानाचे संपूर्ण




कुटुंब आतुरतेने वाट पाहत होते. जवानाचा गावात प्रवेश होताच तोफांची सलामी देऊन कुटुंबाच्या वतीने आई वडिलांनी गोड भरवून त्यांचं औक्षण करण्यात आलं. २४ वर्ष देश सेवा करून सुखरूप गावी आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# लिंबागणेश येथे छावा चित्रपट प्रदर्शित ; अनुष्का रणखांबच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

- - - -
लिंबागणेश:- ( दि.१६ ) छत्रपती संभाजी महाराजांचा ईतिहास नविन पिढी पर्यंत पोहोचवला गेला पाहिजे या दृष्टिकोनातून बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे काल दि.१५ मार्च रोजी रात्री कु.अनुष्का शिवाजी रणखांब हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने छावा चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. गावच्या प्रमुख चौकात मारोती मंदिरासमोर सोय करण्यात आली होती.चित्रपट सुरू करण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करुन अनुष्का हिचा वाढदिवस साजरा केला. यावेळी अनुष्काच्या कुटुंबियांनी तिचे औक्षण केले यावेळी डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड व ग्रामस्थ शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईतिहास, भावना, उत्कटता, देशभक्ती,साहस दृष्ये यांचा सुरेख संगम साधला गेलेल्या अप्रतिम कलाकृती असलेल्या छावा चित्रपटात पहिल्यांदाच छत्रपती संभाजी महाराजांची ज्या क्रुर पद्धतीने औरंगजेबाने हत्या केली तो दुर्दैवी प्रसंग पाहताना अक्षरक्ष: काळजावर दगड ठेवून छत्रपती संभाजी महाराजांना दिलेली वेदना पाहुन हृद्य पिळवटून जाते. भावना अनावर होतात. या प्रसंगी महिला भगिनी, तरूण वर्ग छत्रपती संभाजी राजांची वेदना पाहुन अगदी ढसाढसा रडत होते. चित्रपटाच्या शेवटी शिवगर्जना आणि घोषणाबाजी करण्यात आली. मुलीच्या वाढदिवसा निमित्ताने छावा




चित्रपटाचे आयोजन करताना ग्रामीण भागातील लोकांना गावातच चित्रपट पहाता यावा यासाठी अनावश्यक खर्च टाळुन गावात चित्रपटाचे आयोजन करण्यात आल्याचे अनुष्काचे वडील शिवाजी रणखांब यांनी सांगितले.

# वाळू वाहतूक करताना टिप्पर पकडल

माजलगाव । प्रतिनिधी तालुक्यातील शेलगावथडी शिवारातील बंधाऱ्याजवळ अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच छापा टाकून ग्रामीण पोलिसांनी ७ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त केला माजलगाव तालुक्यात गोदावरी किनाऱ्यावरी गावातून मोठ्या प्रमाणात अवैध्य वाळू उपसा करून विक्री केली जात असून याकडे पोलीस महसूल प्रशासन सतत दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते परंतु पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पोलिसांना सक्त आदेश दिल्यामुळे अवैध धंद्यावर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरु केला आहे. माजलगाव तालुक्यातील शेलगावथडी शिवारातील बंधाऱ्याजवळ छोट्या टिप्परच्या साहाय्याने गोदावरी नदी पात्रातील अवैध वाळू वाहतूक करताना गणेश रामा वराट (वय २५) रा. टाकरवन ता. माजलगाव यांच्यावर माजलगाव ग्रामीण पोलिसांनी कारवाई करुन पिवळ्या रंगाचे अशोक लेलॉन्ड कंपनीचा छोटा टिप्पर क्र. एम एच ३७ टी २०२१ अंदाजे किंमत ७ लक्ष तसेच एक ब्रास वाळू अंदाजे किंमत ६००० रु असा ७ लक्ष ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात प्रसून चालक पोलिसांना पाहताच पसार अधिक तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करत आहेत.

# जिशान मुस्तफा सय्यद चिमुकल्यांचा पहिला रोजा पूर्ण..जिशान सय्यद (वय ८ ) आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला

## सय्यद व मित्र परिवार कडुन जिशानचे कौतुक व अभिनंदन होत आहे

पाटोदा (प्रतिनिधी)मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारेपाटोदा येथील प्रसिद्ध विश्वास डेव्हलपर्स चे संचालक सय्यद मुस्तफा यांचा लाडका चिमुकला जिशान सय्यद (वय ८ वर्षे) याने त्याच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे



आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल त्यांच्या कुटुंबाच्या वतीने व नाना,नानी, दादा, दादी, मामा, मामी,आत्या व सर्व सय्यद व मित्र परिवार कडुन जिशानचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# प्रवासांचा जिव धोक्यात घालुन मोबाईल टॉर्च लावुन आणावी लागली बस



माजलगाव । प्रतिनिधी येथील आगारातील ना-दुरुस्त बसेस ग्रामीण भागातील फेऱ्या साठी सोडत असल्याचे माजलगाव आगाराच्या गलथान कारभाराला ग्रामीण भागातील प्रवासी वैतागले असुन दि १५ मार्च शनिवार रोजी सायंकाळी माजलगाव-पुरुषोत्तमपुरी हि बस माजलगाव आगारातुन पुरुषोत्तमपुरी येथील प्रवासी घेऊन पुरुषोत्तमपुरी येथे सदर बस पोहचली मात्र ज्ञदर बस पुरुषोत्तमपुरी येथुन माजलगाव कडे निघाली असता सदर बसचे समोरील दोन्ही हेडलाईट बंद पडल्यामुळे बस चालक व वाहक यांची मोठी तारांबळ उडाली मात्र वाहक आणी चालक यांनी त्यांची अनोखी शक्कल लढवत त्यांनी चक्क सदर दोन्ही लेडलाईट अभावी बंद पडलेली बस मोबाईल टॉर्च चा आधार घेऊन प्रवाशांचा व स्वतःचा जीव धोक्यात घालून बस पुरुषोत्तमपुरी - माळेवाडी या ठिकाणाहून माजलगाव कडे रवाना केली.

# माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस स्थगिती देण्यास दिवाणी न्यायालयाचा नकार

माजलगाव । प्रतिनिधी माजलगाव नगरपरिषदेने केलेल्या कर (टॅक्स) वसुली बाबत अनेक व्यावसायिकांची व व्यापाऱ्यांची नाराजगीमुळे डॉ. सुशिल लोढा, गणेश थिगळे व मनोज शर्मा यांनी मा. दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) माजलगाव यांचे न्यायालयात कर वसुलीची नोटीस रद्द करणे बाबत तसेच सदर कर वसुली स्थगित करणे बाबत दावे दाखल केले होते. सदर प्रकरणात सुनावणी होवून कर वसुलीस स्थगिती देण्यास मा. दिवाणी न्यायालयाने नकार दिलेला आहे. सदर प्रकरणात माजलगाव नगरपरिषदेच्या वतीने अँड. बी. आर. डक यांनी युक्तीवाद केला. माजलगाव नगर परिषदेने सन २०१७ व २०१८ मध्ये शहरातील निवासी व्यावसायिक बांधकामांचा व अन्य जागेचा कर आकारणी बाबत सर्वे केला होता. त्या अनुषंगाने आक्षेप मागवले. ज्याच्या सुनावण्या सन २०२० मध्ये झाल्या. त्यानंतर सदर प्रकरणात सुनावणी होवून सन २०२१ मध्ये कर वसुलीच्या नोटीस देण्यात आल्या होत्या. सदर कर वसुलीच्या नोटीस विरुध्द डॉ. सुशिल लोढा, गणेश सदाशिव थिगळे, मनोज रामगोपाल शर्मा यांनी कर वसुलीची नोटीस रद्द करणे बाबत तसेच कर वसुलीस स्थगित मिळणे बाबत रे. दि. दा. नं. ९६/२०२१, रे. दि.दा. नं. ९७/२०२१ व रे.दि.दा.नं. ९८/२०२१ असे तीन दावे दाखल केले होते. सदर दाव्यात नगरपरिषद माजलगाव च्या वतीने अँड. बी. आर. डक यांनी लेखी बाजु मांडुन युक्तीवाद केला व संपूर्ण सुनावणी अंती मा. न्यायालयाने माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस स्थगिती देण्यास नकार दिलेला आहे. या निर्णयामुळे माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस कायदेशीर अडथळा दूर झालेला आहे.



बीड - जिल्हा शल्यचिकित्सक मा.डॉ.आशोकजी थोरात सर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना युवा उद्योजक मा. सुहासजी पिंगळे शिवकल्याण सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. आकाश परमेश्वर सोनवणे अदि संघटनेचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

# जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियानाची वेरूळ येथून १८ मार्च पासून सुरुवात ५,६,७ एप्रिल रोजी रथयात्रा नांदेडात

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा सेवा संघाच्या वतीने 18- मार्च ते 1-मे दरम्यान महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान हे ब्रीद घेऊन जिजाऊ रथयात्रा फिरणार आहे.नांदेड मध्ये ही रथयात्रा 5- एप्रिल रोजी दुपारपासुन 7-एप्रिल दुपारपर्यंत शहरासह विविध तालुक्यात फिरणार आहे. मराठा सेवा संघ महाराष्ट्रातच नव्हे जगभरात जिजाऊ,शिव,शाहु,फुले,आंबेकर विचार जनमाणसात रुजविण्याचे काम केले आहे. प्रबोधनाच्या माध्यमातुन अनेक लेखक,वक्ते,शाहीर, किर्तनकार निर्माण केले मराठा बहुजन समाजाला विविध विषयांवर सभा, कॉर्नर बैठकांच्या माध्यमातुन चर्चा करण्यासाठी आपापसातील संवाद वाढविण्यासाठी ही रथयात्रा महत्वाची ठरणार आहे.18- मार्च रोजी शहाजी महाराज जयंती दिवशी भोसले गढी वेरुळ येथुन निघुन 1-मे रोजी कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे लालमहल येथे समारोप होणार आहे.ही रथयात्रा नांदेड जिल्ह्यात शनिवार 5-एप्रिल रोजी दुपारी वसमत मार्गे,आलेगाव,निळा,तळणी मार्गे नांदेड शहरात येईल व मुक्काम असेल 6- एप्रिल रोजी नांदेड शहरातुन गुरुद्वारा,सिडको,लोहा, कंधार,मुखेड व नरसी फाटा येथे मुक्काम असेल 7-एप्रिल रोजी नरसी फाटा येथुन निघुन नायगाव,उमरी,भोकर,हदगाव मार्गे उमरखेड जिल्ह्याकडे जाईल महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या जिजाऊ रथयात्रेतुन नक्कीच सर्वंच चळवळींना बळ मिळेल व ऊर्जा मिळेल.सदरील रथयात्रेच्या निमित्ताने नांदेड येथील यशवंतराव चव्हाण विद्यार्थी वसतिगृह येथे बैठक घेऊन मोठ्या संख्येने समाज बांधवांनी या रथयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व 33 कक्षाच्या वतीने करण्यात आले.




# सौ.के.एस.के.महाविद्यालयात शास्त्रीय संगीत महोत्सव कार्यक्रम संपन्न

दिनांक १५ मार्च २०२५ रोजी नवगण शिक्षण संस्थेचे सौ .केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या उपाध्यक्ष मा.डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरूवात संस्थेचे प्राशसकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे , डॉ.विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस.,कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे,प्रा.पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांच्या हस्ते उदघाटन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.या महोत्सवामध्ये शास्त्रीय संगीत,गायन,नाट्यगीत व उपशास्त्रीय संगीत,गझल अशा विविध गीत प्रकाराचे सादरीकरणअ करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी आपल्या मनोगतामधून संगीत विभागाची सुरूवात ते आजपर्यंतच्या यशस्वीतेचा लेखाजोखा मांडला. संगीत



महोत्सवामध्ये देवयानी वाघमारे,श्रृष्टी आनेराव, कैवल्य सुरवसे,अमर मोरे,सुभाष शिंदे,विजय कोरडे,सिध्देश्वरी कोकाटे, अश्विनी कोकाटे,शिवांगीनी गाडे, श्रीकांत देशमुख,पवन शिंदे,आदीत्य दुनगु या विद्यार्थ्यांनी ख्याल गायन,गझल गायन व नाट्यगीत गायन सादर केले. या कार्यक्रमाची साथसंगत रविंद्र दादर, व पवन शिंदे,प्रा.इंद्रजीत भांगे यांनी केली. तसेच प्रा.इंद्रजीत भांगे यांनी राग शंकरातील बंदिश सादर केली. तसेच प्रा.राहूल सोनवणे घारगावकर यांनी रागजोग गाऊन या मैफलीची उंची वाढवून कार्यक्रमाची सांगता केली. संगीत महोत्सवाच्या यशस्वीतेमध्ये संगीत विभागाचे प्रा.दीपक जमधाडे,प्रा. सुरेश थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.राहूल सोनवणे, तर आभार प्रा.दीपक जमधाडे यांनी केले. या कार्यक्रमास आदी सह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संगीत विभागातील विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

# २०२५ ची पोलिस भरती होणार तरी कधी?:



गेल्या दिड महिन्या पासुन १२०००हाजार पोलिस पदाची भरती लागा तयारीला . हिच बातमी पाहुन सर्व सामान्य कुटुंबातील मुल मुली दिवस रात्र मेहनत करुन भरतीच्या तयारीला जोमात लागली आहेत. पण मोबाईल वर दररोज अपडेट वर अपडेट पडतात, पोलिस भरती लवकरच....! ! मंग पुर्ण फेब्रुवारी निघुन गेला मार्च संपत आला तरी पोलिस भरतीची तारीख काहि डिकलेर झाली नाही. पहिलच पोलिस खात्यात हेवड्या जागा रिकाम्या आसुन सरकार भरतीच का लवकर मनावर घ्याईना ? गेल्यावर्षी पावसाळ तोंडाला भरती झाली, पडत्या पावसात विध्यार्थी मित्रानी भरती दिली. प्रत्येक जिल्ह्यात गैर सोई झाल्या, काही जिल्ह्याच्या तर फिजिकलच्या तारखा पुढ ढकलाव्या लागल्या . गेल्या वर्षासारखी बेजारी ह्या वर्षी होणार नाही आशी आशा पोलिस भरती करणाऱ्या विध्यार्थी मित्रांना लागली आहे. आधिच तर तीन वर्ष ठाव मांडुन बसलेल्या कोरोना सारख्या रोगात काहिंचे भरतीचे वय निघुन गेले. गेल्या दोन - आडिच महिन्यात सरकार बदलुन मंत्रीमंडळाचा विसतार पण झाला, राज्यमंत्री पद पण वाटप झाली. आता कुठ सुरळित सार सुरु आसुन सुधा भरतीची वाट ही पाहावच लागत आहे. काहि विध्यार्थी मित्रांना तर प्रश्न पडतोय की या वर्षी पोलिस भरती होणार आहेच की नाही?

# डॉ.सतीश साळुंके यांना हिंदी राज्यनाट्य अंतिम स्पर्धेत अभिनयाचे बक्षीस

पुणे नागपूर व मु ंबई या संयुक्त केंद्रात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धे त प्रसिद्ध रंगकर्मी डॉ. सतीश साळु ंके यांना म बिहाइंड दी कर्टनफ या नाटकातील अप्रतिम अभिनयाबद्दल विशेष गुणवत्ता अभिनय बक्षीस पटकावले. हिंदी नाट्य स्पर्धेत बीडच्या कलावंताला प्रथमच असे बक्षीस मिळाले. डॉ. सतीश साळु ंके लिखित व दिग्दर्शित मबिहाइंड दी कर्टनफ हे नाटक नुकतेच मु ंबईच्या साहित्य संघ या नाट्यगृहात झाले. या स्पर्धे त महाराष्ट्रातून ५८ नाटकातून शेकडो कलावंतांनी सहभाग घेतला होता. पुणे नागपूर व मु ंबई या ठिकाणी या स्पर्धा पार पडल्या. परिवर्तन प्रतिष्ठान बीडच्या वतीने प्रस्तुत नाटक मु ंबई केंद्रावर झाले. त्यात प्रा सुधाकर विश्वमित्रेच्या भूमिकेबद्दल डॉ. सतीश साळुंके यांनी अभिनयाचे बक्षीस पटकावले. विशेष म्हणजे याच भूमिकेसाठी त्यांना गतवर्षी मराठी राज्य नाट्य स्पर्धेतही बक्षीस मिळाले होते. डॉ. साळु ंके यांनी आत्ता पर्यंत तीस एकांकिका, बारा स्वतंत्र नाटके, एकोणिस बालनाटक तसेच बीड जिल्ह्याच्या इतिहासावर चार ग्र ंथ लिहिले असून ममराठवाड्याची नाट्य परंपराफ हा हजार पानांचा बृहतग्र ंथ महाराष्ट्र ात नाट्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गौरविल्या गेला आहे. त्यांच्या विविध दहा पुस्तकांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ही पुरस्कार लाभले आहेत. २००४ साली त्यांना भारत सरकारने तत्कालीन राष्ट्रपती आदरणीय एपीजे अब्दुल कलाम यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कार देऊन गौरवले होते. परिवर्तन प्रतिष्ठानच्या माध्यमातून डॉ. साळु ंके यांच्या अनेक विद्यार्थी कलावंतांना अभिनयाची रौप्यपदके व दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्याची बक्षिसे राज्यस्तरावर मिळाले आहेत. मबिहाइंड दी कर्टनफ या नाटकात उल्का कुलकर्णी, डॉ. गणेश शिंदे, प्रा तन्मय शेटगार, मुकु ंद धुताडमल, प्रा. प्रवीण निसर्गंध, अण्णासाहेब गडदे

# अनैतिक संबंधातून आष्टीत मालकाने दोन दिवस डामून ठेवल मारहाणीत ड्रायव्हरचा मृत्यू





## तीन वर्षांपासून तो ड्रायव्हर

मागील तीन वर्षांपासून विकास बेनसोडे हा तीन वर्षांपासून या कुटुंबाकडे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करीत होता. त्यास कामावरून काढण्यात आले होते. तो दोन दिवसांपूर्वी गाव-ात आला होता. यावेळी तो ट्रक मालकाच्या शेतात मित्रासह होता यावेळी मित्र पळून गेला यास पकडून डांबून ठेवून मारहाण केली. या मारहाणीत शनिवारी रात्री त्या ट्रक चालक तरुणाचा मृत्यू झाला.

आष्टी । तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे धक्कादायक घटना घडल्याचे उघडकीस आले असून, ट्रक मालकाने अनैतिक संबंधाच्या संशयातून ट्र क चालकाला डांबून ठेवून सलग दोन दिवस मारहाण केली. यात या तरुण ट्रक चालकाचा मृत्यू झाला. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील विकास बनसोडे (२५ वर्षे) हा तरुण भाऊसाहेब क्षीरसागर यांच्याकडे ट्र क चालक म्हणून कामाला होता असे सांगितले जात आहे. क्षीरसागर यांच्या मुलीसोबत विकासचे प्रेम प्रकरण सुरू असल्याचा संशय होता. घराच्या मागील शेतात आपल्या मुलीबरोबर विकास दिसल्याने भाऊसाहेब क्षीरसागर संतप्त झाले होते. त्यांनी विकासला एका खोलीमध्ये डांबून ठेवत दोन दिवस बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या विकासचा जागीच मृत्यू झाला. विकासचा मृत्यू झाल्याचे कळतात कडा चौकीला कळविण्यात आले. शवविच्छेदनासाठी विकासचा मृतदेह कडा येथील प्रथमिक आरोग्य केंद्रामध्ये पाठवण्यात आला. विकासची हत्या करणाऱ्या मुख्य संशयित आरोपीला आष्टी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेने पुन्हा बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, दररोज काहीना काही प्रकार घडत आहेत. यामुळे जिल्ह्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# धानोऱ्यातील तुकाराम मोरे रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांना करतात जागे!

एकीकडे समाजात जातीयवादाची विषारी बीजे पेरून समाज नासवणारी काही समाजविघातक विषवल्ली फोफावत असताना दुसरीकडे मात्र मानवता हाच धर्म ही संकल्पना जपणारी माणसंही समाजात पहावयास मिळतात. भारतीय समाजाचे हिंदू मुस्लिम हे दोन मोठे घटक सतत गुण्यागोविंदाने नांदतात. मात्र काही समाजद्रोही या समाजात तेढ निर्माण करून सतत द्वेषाचा वणवा पेटवत ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांसाठी धानोरा (ता. आष्टी) येथील तुकाराम मोरे हा आदर्श व्यक्ती सनसनाटी चपराक ठरत आहे. तुकाराम मोरे गेल्या अनेक वर्षांपासून



पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधवाना पहाटे सहेरीसाठी झोपेतून जागे करण्याचे काम करतात. मुस्लिम बांधव रमजानचे महिनाभर उपवास करतात. हे उपवास पहाटे पाचच्या आधी सुरू करण्यात येतात. सायंकाळी सात वाजण्याच्या आसपास सोडले जातात. या कालावधीत कसलेही अन्न पाणी न घेता पूर्ण निरंक असे कडक उपवास हे बांधव करतात. या पुण्य कर्मात आपलाही खारीचा वाटा असावा म्हणून तुकाराम मोरे हे रात्री तीन वाजताच घराबाहेर पडतात. सर्व मुस्लिम बांधवाना दारोदारी जाऊन झोपेतून जागे करतात. रात्री त्यांना चोराची भीती वाटत नाही की अंधाराची भीती वाटत नाही. आपले काम ते महिनाभर स्वेच्छेने चालूच ठेवतात. दरवर्षी त्यांचा हा उपक्रम समाजात जातीय सलोखा निर्माण करून समाजाला चांगली दिशा देणारा आहे. मुस्लिम बांधवही तुकाराम मोरे यांना रमजान ईदच्या दिवशी स्वेच्छेने सत्कार करीत कपडे, काही रक्कम भेट देतात. तसेच प्रत्येकजण सन्मानाने मोरे यांना आपल्या घरी बोलावून शिरखुर्मा, मिठाई खाऊ घालतात. तुकाराम मोरे यांच्यासारख्या सेवाभावी वृत्तीच्या लोकांचा आदर्श सर्व समाजाने घेणे गरजेचे आहे.

# भगवंताच्या नामस्मरणाच्या रंगात रंगून जा : ह भ प भरत महाराज साळुंके

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या सेवेमध्ये भरत साळु ंके महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचाश्रश्नरंगी रंगला श्रीरंग श्रश्नहा अभंग घेतला होता या अभंगावर भाष्य करताना भरत महाराज म्हणाले की मानवी जीवन जगत असताना इतर कुठल्याही नश्वर रंगाच्या पाठीमागे लागून रंगण्यापेक्षा भगवंताची तन-मन-धनाने भक्ती करून ईश्वराच्या रंगांमध्ये रंगून जा यामुळे आपल्या जीवनाचे सार्थक होईल असा अनमोल सल्ला महाराजांनी आपल्या प्रथम सेवेच्या पुष्प गु ंफतांना व्यक्त केलेसविस्तर चिंतनामध्ये महाराजांनी सांगितले की आपले पत्नी, मुले, धनदौलत ही नष्ट होणारी आहे कधीही न चोरी जाणार धन म्हणजे परमार्थपरमार्थ महाजन जोडी देवाची चरण सेवा होय आपल्या हाताने केलेले दान आणि स्वतः केलेलं भगवंताचे चिंतन म्हणून हे वाया जात नाही शेवटच्या घडीला फक्त आणि फक्त देवाचंच नाम कामी येतं असं महाराज म्हणाले या कीर्तन सेवेसाठी ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठाचे ह भ प व गायक स्वर सम्राट परमेश्वर महाराज आतकरीआणि उत्कृष्ट परववाज वादक अंकुश महाराज खराबे हे उपस्थित होते कीर्तन श्रवण करण्यासाठी परिसरातील भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते ।

# बीड शहरातील पंधरा वर्षीय मुलगा बेपत्ता

बीड शहरातील पालवण चौक, धानोरा रोड येथून १५ वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. तेजस प्रकाश घोलप असे या विद्यार्थ्याचे नाव असून,तो पोद्दार इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. तेजसचे वडील प्रकाश घोलप यांनी १३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता त्याला शाळेत सोडले होते. त्यानंतर दुपारी १ वाजता तेजसने शेजाऱ्यांच्या मोबाईलवरून आईला फोन करून घरी येण्याची वेळ विचारली. आई आशा घोलप या शिक्षक असून त्या शाळेच्या कामानिमित्त बाहेर होत्या. त्यांनी परतायला उशीर होणार असल्याचे सांगितले. दुपारी ३ वाजता आई घरी परतल्यावर घराला कुलूप दिसले.



# आम सभा ही सर्वसामान्य जनतेच्या न्यायाचे दालन आहे सरपंचांनी, कार्यकर्त्यांनी जनतेची कामे करावीत-आ.धस

आष्टी । गेल्या आठ वर्षात आष्टी पंचायत समितीची आमसभा झालेली नाही त्यामुळे अनेक गावांमध्ये अनेक प्रकारचे प्रश्न प्रलंबित आहेत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळालेला नाही आष्टी तालुक्यातील प्रलंबित असलेले सर्व घटकांतील घरकुलांची कामे गावातील शाळा खोल्यांची बांधकामे अंगणवाडी खोल्या बांधकाम जलजीवनच्या अपूर्ण योजना पूर्ण कराव्यात आणि ग्रामसेवक तलाठी महावितरण कर्मचारी यांनी जनतेला आर्थिक वेठीला धरू नये असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील पंचायत समितीच्या आमसभेमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर माजी सभापती बद्रीनाथ जगताप सरपंच परिषदेचे प्रदेश अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी उपविभागीय अधिकारी श्रीमती व सीमा शेख तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील गट विकास अधिकारी श्री गोकुळ बागलाने बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती बेल्हेकर तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे माजी उपसभापती रंगनाथ धोंडे एनटी गर्जे परमेश्वर शेळके नगराध्यक्ष जिया बेग, शिराळ येथील प्रगतीशील शेतकरी गौतम नाना आजबे, कल्याण काका काकडे, शिराळचे माजी सरपंच बंडू आबा आजबे, आदी उपस्थित होते



# मातोश्री सिलेक्शनला भीषण आग; लाखो रुपयाचे नुकसान आठवड्यातली दुसरी घटना,अग्निशामक गाडी नावालाच





## अग्नीशमन दल कशासाठी!

वडवणी नगरपंचायत ची अग्नीशमन दल हे नियमित पाणी अभावी आगीचे प्रकार घडताच निकामी राहते यामुळे दरवर्षीच लाखो रूपये खर्च करून गाडीची देखभाल नेमकी कशासाठी हा प्रश्न उपस्थित होत आहे.याबाबत अधिकारी अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे मात्र कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले नसून सुविधा ही उपलब्ध नसल्याने आग विझवण्यात अपयश येत आहे.

## अग्निशामक गाडी नावालाच

वडवणी नगरपंचायत कडे अग्निशामक गाडी आहे परंतु या गाडीवर प्रशिक्षित लोक नाहीत त्यामुळे लागलेली आग विझवताना अडचण निर्माण होतात तसेच गाडीमध्ये पाणी देखील नसते आग लागल्यापासून ही गाडी तास दीड तासाने लेट येत असल्याने दुकानात लागलेली आग नियंत्रणात आणण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे त्यामुळे ही गाडी वडवणी शहरांमध्ये नावालाच असल्याचे दिसत आहे.

वडवणी शहरातील चिंचवण रोड वरील मातोश्री सिलेक्शन ला शुक्रवार रात्री ९ वाजण्याच्या सुमारास भिषण आग लागली यात दुकानांमधील रेडीमेड कपडे जळून खाक झाल्याने जवळपास ५० लाखाचे नुकसान झाले आहे असल्याचे बोलले जात आहे आग लागण्याची आठवड्यातील ही दुसरी घटना असून सहा मार्च रोजी पतंगे हार्डवेअर दुकानालाही आग लागली होती. यातही दीड ते दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. चिंचवड रोडवर लंगे यांचे मातोश्री सिलेक्शन आहे या दुकानातून शुक्रवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास धुर निघू लागला असता नागरिकांनी दुकान उघडले आतमध्ये आग लागलेली होती यावेळी वडवणी नगरपंचायत च्या अग्निशामक दलाची गाडी बोलवण्यात आली परंतु ही गाडी एक ते दीड तास लेट आली तोपर्यंत आग ही इतरत्र पसरली होती शहरातील नागरिकांच्या मदतीने दुकानातील काही सामान बाहेर काढण्यात आले श.या आगीमध्ये रेडीमेड कपडे जळून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तसेच फर्निचर ही जळाले अजून जवळपास ५० लाख रुपयाचे नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे .ही आग शॉर्टसर्किटने लागलेली असल्याचे दुकानदार मालक भोलेनाथ लंगे यांनी व्यक्त केला आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com